प्रेसनोट

जा.क्र. 330 /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :— २८/०६/२०१८

## " विनयभंग करणाऱ्या आरोपीस तिन वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे मोहाडी अंतर्गत राजेंद्र वार्ड मोहाडी येथिल तक्रारदार यांचे घरी ईसम नामे नासिर उर्फ जग्गु जलील शेख, वय ४० वर्ष, रा. सुभाष वार्ड मोहाडी, ता. मोहाडी जिल्हा भंडारा याने अल्पवयीन पिडित मुलगी वय १७ वर्ष हि घरी एकटीच असल्याचे पाहुन घरात प्रवेश करून विनयभंग केल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक २८.०६.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त प्रथम सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांनी आरोपीस तिन वर्ष सश्रम कारावास व ५०००/— रूपये द्रव्यंडाची शिक्षा ठोठावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २५.०१.२०१६ रोजी तक्रारदार हि घरी असतांना सकाळी ९.०० वा. सुमारस नासिर उर्फ जग्गु जलील शेख हा घरी आला व गाडी पाहिजे म्हणुन तक्रारदार यांना बोलला परंतु पती घरी नसल्याचे सांगीतल्याने तो निघुन गेला. तक्रारदार हिचे भावाचा साक्षगंधाचा कार्यक्रम असल्याने ११.३० वा सुमारास मोठी मुलगी पिडित वय १७ वर्ष हिस घरी ठेवुन लहान मुलगी वय ८ वर्ष हिचे सोबत कार्यक्रमास निघुन गेली तक्रारदार हिचा पती सुध्दा ३.०० वा. सुमारास मोठी मुलगी हिस घरी ठेवुन कार्यक्रमास जाण्यास निघुन गेला. साक्षगंधाचे कार्यक्रमावरून तक्रारदार पतीसोबत सायंकाळी ६.०० वा. सुमारास घरी परत आल्यानंतर घरात गेले असता तक्रारदार यांची नमुद मुलीशी बळजबरीने शारीरीक आगळीक करून विनयभंग केला व पळुन गेला. तक्रारदार यांनी नासिर उर्फ जग्गु जलील शेख याचे विरूध्द पो.स्टे. मोहाडी येथे जावुन तोंडी तक्रार दिलेवरून, अप.क्र. ७/१६ कलम ३५४, ३५४(ब), ३४१ भा.द.वि. सह कलम ८ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक अधिनीयम २०१२ अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक सुहास चौधरी यांनी सुरू करून गुन्हयातील आरोपी नासिर उर्फ जग्गु जलील शेख, वय ४२ वर्ष यास तात्काळ अटक केले व साक्षपुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने दोषारोप पत्र जिल्हा व सत्र

न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ९/१६ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी अतिरीक्त **सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा**. यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. प्रमोद भुजाडे, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक २८.०६.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **नासिर उर्फ जग्गु जलील शेख, वय ४० वर्ष** याचे विरूध्द **कलम ८ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक अधिनीयम २०१२** अन्वये दोषसिध्द झाल्याने **तिन वर्ष सश्रम कारावास व ५०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास २ महिणे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, शिवाजी कदम, ठाणेदार पोलीस ठाणे मोहाडी यांचे मार्गदर्शनात पोलीस नाईक, घनशाम गोमासे/८९६ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(एस. बी. ताजणे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
दुरध्वनी क्र.०९५४५९९७०२५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**: संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.